<u>तात्काळ / अर्थसंकल्प प्राथम्य</u> महाराष्ट्र विनियोजन अधिनियम, २०२५

निधी वितरण...

**महाराष्ट्र शासन**

वित्त विभाग

**शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक :- ०७ एप्रिल, २०२५.

**<u>परिपत्रक</u>**

सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात येते की, "**महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०२५**" (महाराष्ट्र विनियोजन अधिनियम, २०२५) च्या अनुसूचीतील स्तंभ- ४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रकमांस विधानमंडळाने मंजूरी दिलेली असून महाराष्ट्राचे मा. राज्यपाल यांनी त्यास अधिसंमती दिलेली आहे आणि ते २०२५ चा **महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९** म्हणून **महाराष्ट्र राजपत्र असाधारण भाग-४, दि.३१ मार्च, २०२५** यामध्ये प्रसिध्द करण्यात आला आहे.

२. वित्तीय वर्ष २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय तरतूदींची मासिक निधी विवरणपत्रे, अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप आणि संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) प्रशासकीय विभागांकडून नोंदविण्यात आल्यानंतर सन २०२५-२६ च्या प्रथम **नऊमाहीकरीता (डिसेंबर, २०२५ अखेर**) आवश्यक असणारा अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत खर्चाचा अर्थसंकल्पीत निधी एकूण **<u>वार्षिक तरतूदीच्या ६० टक्केच्या मर्यादेत</u>** तसेच, १) आमदार स्थानिक विकास कार्यक्रम निधी २) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण/ अनुसूचित जाती घटक कार्यक्रम/आदिवासी घटक कार्यक्रम) यासाठी प्रथम **नऊमाहीकरीता (डिसेंबर, २०२५ अखेर) <u>६० टक्केच्या मर्यादेत</u>** अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप आणि संनियंत्रण प्रणालीव्दारे (बीम्स) वितरीत केला जाईल.

अ) खालील नमूद योजनांसाठी निधी वितरणाची मर्यादा १०० % राहिल.

- केंद्र पुरस्कृत योजनेतील केंद्र व राज्य हिस्सा
- १५ व्या वित्त आयोगाच्या तरतूदी
- केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणूकीसाठी विशेष सहाय्य योजनेंतर्गत ५० वर्ष मुदतीचे बिनव्याजी कर्ज.
- नाबार्ड/सिडबी/एनएचबी या संस्थांकडून प्रतिपूर्ती स्वरुपात प्राप्त होणाऱ्या कर्जासाठीची तरतूद.

सदर मासिक विवरणपत्रानुसार निधी एप्रिल ते डिसेंबर, २०२५ या कालावधीमध्ये पुढे / मागे ओढून घेण्याची सुविधा अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप आणि संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) देण्यात येत आहे. निधी वितरीत करताना मासिक निधी विवरणपत्रात (Cash Flow Statement) ज्या दरमहा खर्च रकमा दर्शविण्यात आलेल्या आहेत त्याच्याशी सुसंगत असाव्यात.

३. सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात येते की, पुढील नमूद उद्दिष्टांकरीता निधी वितरणाचे प्रस्ताव ठोस समर्थनासह आवश्यकतेनुसार नियोजन विभाग/ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग/

आदिवासी विकास विभाग यांच्यामार्फत तसेच, आपल्या विभागाच्या अर्थसंकल्प शाखेमार्फत वित्त विभागास मान्यतेस्तव सादर करण्यात यावेत.

| | | |
|---|---|---|
| ०५- बक्षीसे | २७- लहान बांधकामे | ५०- इतर खर्च |
| १२-विदेश प्रवास खर्च | ३०- इतर कंत्राटी सेवा | ५१- मोटार वाहने |
| १६-प्रकाशने | ३१- सहायक अनुदाने (वेतनेतर) | ५२- यंत्रसामग्री व साधनसामग्री |
| १७- संगणक खर्च | ३२- अंशदाने | ५३- मोठी बांधकामे |
| २०- इतर प्रशासकीय खर्च | ३३- अर्थसहाय्य | ५४- गुंतवणूका |
| २१- पुरवठा व सामग्री | ३५- भांडवली मत्तेच्या निर्मितीकरीता अनुदान | |
| २६- जाहिरात व प्रसिध्दी | | |

४. अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध असलेला निधी कोपागारातून आहरित करण्यापुर्वी खालील परिच्छेद ५ ते १९ मधील मार्गदर्शक सूचना व परिशिष्टामधील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

५. प्रशासकीय विभागांनी निधी वितरण करताना महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिकेमध्ये उल्लेख केलेल्या नियमांचे पालन करावे. तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१ वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विअप्र-२०.१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत किंवा त्या-त्या विभागांना वेळोवळी वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-२ अन्वये प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारांतर्गत असलेल्या प्रकरणांबाबत निधी वितरण करताना उपरोक्त परिच्छेदातील अटी व शर्तीचे पालन करण्याच्या अटींच्या अधिन राहून, वित्त विभागाची वेगळ्याने मान्यता घेण्याची आवश्यकता नाही. तथापि, उपरोक्त शासन निर्णयात नमूद केल्याव्यतिरिक्त ज्या बाबींसाठी विभागांना विवक्षितपणे वित्तीय अधिकार प्रत्यार्पित केले नसतील अशा बाबींच्या संदर्भात वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता असेल.

६. नवीन खर्चाच्या अनुपंगाने नवीन बाब प्रस्तावाव्दारे तरतूद केलेल्या अनिवार्य खर्चाच्या निधी वितरणाबाबत वित्त विभाग व कार्यक्रम खर्चाच्या निधी वितरणाबाबत वित्त विभाग तसेच आवश्यकतेप्रमाणे नियोजन विभाग, सामाजिक न्याय व विशेप सहाय्य विभाग व आदिवासी विकास विभाग यांची मान्यता घेणे आवश्यक आहे.

७. पदनिर्मितीच्या अनुपंगाने वेतनावरील निधी वाटपाच्या संदर्भात आवश्यक तेथे उच्चस्तरीय सचिव समिती / मंत्रिमंडळ यांची मान्यता तसेच वित्त विभागाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांच्या अनुपंगाने कार्यवाही झाल्याची खात्री करण्यात यावी.

८. **सहायक अनुदाने (वेतनेतर)** :- विविध शासकीय/प्रशासकीय संस्थांना तसेच अनुदानित संस्थांना सहायक अनुदाने मंजूर करण्यापूर्वी त्यांचेकडून पूर्वी वितरीत केलेल्या अनुदानाच्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे विभागाने प्राप्त करावीत. यापूर्वी दिलेल्या अनुदानाचा विनियोग पूर्ण झाल्याशिवाय पुढील अनुदान वितरीत करण्यात येऊ नये. कोपागार अधिकाऱ्यांनी, सहायक अनुदानामधून निधी आहरित करण्यासाठी सादर केलेल्या देयकासोबत संबंधित संस्थेचे लगतच्या मागील महिन्यातील बँक अकाऊंट स्टेटमेंट (Bank Account Statement) ची प्रत जोडलेली नसल्यास देयक पारित करू नये.

९. **सहायक अनुदाने (वेतन) :-** शासनाद्वारे देण्यात येणारे वेतन अनुदान लाभार्थ्यांच्या बँक अकाऊंटमध्ये ECS द्वारे प्रदान करणे बंधनकारक राहिल. कोणत्याही परिस्थितीत वेतन अनुदानाची रक्कम एकत्रितरित्या व Offline पध्दतीने वितरीत करण्यात येऊ नये.

१०. **स्थानिक स्वराज्य संस्था व महामंडळे यांना अनुदान** :- स्थानिक स्वराज्य संस्था तसेच महामंडळे यांना अनुदान वितरीत करण्यापूर्वी सदर संस्थांकडून राज्य शासनास येणे असणाऱ्या रकमांचा आढावा घेण्यात यावा व त्या रकमा वसूल करुनच उर्वरित अनुदान वितरीत करण्यात यावे. तसेच शासनाद्वारे सदर संस्थांना वितरीत केलेल्या अनुदानाचा विनियोग व अखर्चित रक्कम कुठे ठेवली आहे याबाबतची तपशीलवार माहिती एकत्रित करण्यात यावी. सदर अखर्चित निधी बँकेमध्ये ठेवलेला असल्यास त्याचे बँक अकाऊंट स्टेटमेंट (Bank Account Statement) शासनास सादर करावे. एखाद्या कार्यक्रमावरील खर्चासाठी उपलब्ध करून देण्यात आलेला निधी अखर्चित असल्यास त्याच प्रयोजनासाठी चालू वर्षी वित्त विभागाच्या अनुमतीशिवाय निधी वितरीत करू नये.

११. **वैयक्तिक लाभार्थ्यांचा कार्यक्रम** :- वैयक्तिक लाभार्थ्यांच्या कार्यक्रमाअंतर्गतची लाभार्थ्यांची देयके आहरित करताना लाभार्थ्यांची यादी निश्चित करुन योग्य त्या तपशिलासह देयकासोबत जोडल्याशिवाय वैयक्तिक लाभार्थ्यांची अनुदाने आहरित करण्यात येऊ नयेत. वैयक्तिक लाभार्थ्यांचे कार्यक्रम आधार क्रमांकाशी संलग्न करण्यात यावे व अनुदानाचे प्रदान इलेक्ट्रॉनिक्स क्लिअरन्स सिस्टम (ECS) व्दारेच करण्यात यावे. तसेच, वैयक्तिक लाभाच्या योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना यासंदर्भात वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक संकीर्ण, २०२२/प्र.क्र.२७/अर्थबळ, दिनांक ०८.०६.२०२२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली असल्याबाबत संबंधित विभागांनी खातरजमा करावी.

१२. **शिष्यवृत्ती:-** शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती, वैयक्तिक लाभार्थी तसेच सवलती पोटी दिलेले अनुदान इत्यादींची प्रदाने इलेक्ट्रॉनिक्स क्लिअरन्स सिस्टम (ECS) व्दारेच करण्यात यावे.

१३. **बांधकाम विषयक प्रस्ताव** :- बांधकाम विपयक प्रस्तावासंदर्भात प्रशासकीय मान्यता / तांत्रिक मान्यता तसेच आवश्यक तेथे सचिव समितीची मान्यता प्राप्त करून कामनिहाय निधी अर्थसंकल्पीत करणे आवश्यक आहे. नवीन कामांबाबत निधीच्या उपलब्धतेची खात्री केल्यानंतरच कामाची निविदा सूचना काढून कार्यारंभ आदेश देण्यात येवून काम सुरू करावे व आवश्यकतेप्रमाणे निधीचे वितरण करण्यात यावे. जुन्या कामांचा आढावा घेऊन ती प्राथम्याने पूर्ण करण्यात यावीत व हा निधी ठेव बांधकामाचे स्वरुपात सार्वजनिक बांधकाम विभागास प्रदान करू नये.

१४. **केंद्र पुरस्कृत कार्यक्रम** :- केंद्र पुरस्कृत योजनांबाबत केंद्र शासनाने वितरीत केलेला निधी राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा झाल्याची खात्री करण्याबाबत वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१०१८/प्र.क्र.४६/ अर्थोपाय, दिनांक ५ डिसेंबर, २०२३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. यासाठी नस्ती वित्त विभागास सहमतीसाठी वेगळ्याने संदर्भीत करण्याची आवश्यकता नाही.

**केंद्र पुरस्कृत योजनांसाठी केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा निधी एकूण अर्थसंकल्पीय तरतूदीच्या १०० टक्केच्या मर्यादेत बीम्स प्रणालीवर वितरीत करण्यात येत आहे. मागील वर्षामधील केंद्र शासनाचा निधी चालू वर्षी खर्च करावयाचा असल्यास त्यास आवश्यकतेप्रमाणे यथास्थिति नियोजन**

**विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व आदिवासी विकास विभाग तसेच वित्त विभागाची सहमती घेणे अनिवार्य राहिल. केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत ज्या विभागाचे SNA खाते सुरू आहे त्या विभागाने सदर निधी विहीत मुदतीत SNA खात्यात वर्ग करण्याबाबत दक्षता घ्यावी.**

१५. **खरेदी प्रक्रिया** :- सर्व मंत्रालयीन विभागांना असेही कळविण्यात येते की, "शासकीय विभागाने करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तिका",उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने त्यांच्या क्र. भांखस - २०१४ /प्र.क्र.८२/ भाग-III / उद्योग-४, दि. १.१२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रसिध्द केली आहे. सदर शासन निर्णय व त्यासोबतच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे तसेच, सदर विभागाने तद्नंतर वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय / परिपत्रक यामधील सूचनांनुसार खरेदी प्रक्रिया पूर्ण करुन पुरवठादार निश्चित झाल्यानंतर तसेच या मार्गदर्शक सूचनेतील अटींचे पालन करुन खरेदीची देयके कोपागारातून आहरित करण्यात यावीत. खरेदी विपयक धनादेश संबंधित पुरवठादाराच्या नावाने व इलेक्ट्रॉनिक्स क्लिअरन्स सिस्टीमद्वारे (ECS) अदा करण्यात यावेत.

१६. **संक्षिप्त देयक** :- अनेक वेळेला विभागांद्वारे संक्षिप्त देयकाव्दारे निधी खर्च करण्यात येतो. मात्र त्याचे तपशीलवार देयक सादर न केल्यामुळे लेखा आक्षेप येतात व अपहार संभवतात. तरी यापुढे विभागांनी ज्या लेखाशीर्पाखाली जुनी तपशीलवार देयके प्रलंबित असतील ती सादर केल्याशिवाय त्या लेखाशीर्पाखालील निधी वित्त विभागाच्या सहमतीशिवाय आहरित करु नये.

१७. **अखर्चित रकमा** :- विविध कारणांमुळे अखर्चित राहिलेला निधी विभागांनी त्यांच्या अधिनस्त महामंडळाकडे हस्तांतरीत करुन तांत्रिकदृष्ट्या खर्च झाल्याचे दाखविले जाते, ही एक प्रकारची अनियमितता आहे, याची विभागांनी नोंद घ्यावी. तसेच त्यांच्या अधिनस्त असलेला यापूर्वीचा अखर्चित निधी (स्वीय प्रपंजी खात्यातील / महामंडळाच्या खात्यातील वा इतर प्रकारे खर्च दर्शवून बाहेर ठेवण्यात आलेला) संपूर्णत: खर्च झाल्याशिवाय तरतुदी आहरित वा वितरीत करु नयेत. याठिकाणी असेही निदर्शनास आणण्यात येते की, स्वीय प्रपंजी लेख्याखाली विभागांकडे बऱ्याच मोठ्या प्रमाणावर निधी अखर्चित असल्याचे दिसून येते. सदर निधीचा ताळमेळ घालून व लेखा परिक्षण करुन निधी विहीत मुदतीत खर्च न झाल्यास तो शासनाच्या तिजोरीत परत करण्यात यावा. सदर अखर्चित निधी बँकेमध्ये ठेवलेला असल्यास त्याचे बँक अकाऊंट स्टेटमेंट (Bank Account Statement) शासनास सादर करावे.

१८. वरील प्रमाणे अर्थसंकल्प अंदाज, वाटप आणि संनियंत्रण प्रणालीवर उपलब्ध असलेला निधी कोपागारातून आहरित करण्यापूर्वी या परिपत्रकात नमूद सूचनांची तसेच सोबतच्या परिशिष्टातील नमूद केलेल्या बाबींच्या तपासणी सूचीप्रमाणे सर्व बाबींची प्रतिपूर्ती होत असल्यास विभागाने त्यांच्या स्तरावर निधी वितरीत करावा, अन्यथा अशा प्रस्तावास प्रशासकीय विभागांनी आवश्यक तेथे नियोजन विभाग / सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / आदिवासी विकास विभाग यांच्या मान्यतेनंतर वित्त विभागाच्या व्यय शाखा व अर्थसंकल्प शाखा यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच असे मान्यतेचे प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविताना कोणत्या अटी व शर्तीस शिथीलता

आवश्यक आहे ते स्पष्टपणे नमूद करुनच योग्य त्या कारणमीमांसेसह प्रस्ताव वित्त विभागाला सहमतीसाठी पाठवावेत.

१९. वेतनविषयक खर्च वगळता उर्वरित बाबींचा खर्च आर्थिक वर्षाचे कालावधीत समप्रमाणात केला जात नाही, असे निदर्शनास येते. निधी उपलब्ध असूनही प्रक्रियेअभावी तो खर्च करता येत नाही. परिणामी, बहुतांश तरतूदी वर्षभर अखर्चित राहतात व आर्थिक वर्षाचे अखेरचे कालावधीत पुरेशा तयारीशिवाय खर्च केला जातो. दरवर्षी मोठ्या प्रमाणावर अर्थसंकल्पीत तरतूद आर्थिक वर्षाच्या शेवटच्या महिन्यात खर्च झालेली दिसते. या सर्व बाबीमुळे वित्तीय शिस्तीचे पालन केले जात नाही. विकास कार्यक्रमांची प्रगती राखली जात नाही. **त्यामुळे सन २०२५-२६ या वर्षासाठी प्रशासकीय विभागांनी खर्चाचे प्रमाण योग्यरित्या नियोजित करावे. याबाबतचा आढावा प्रशासकीय विभागांनी दरमहा प्रशासकीय विभाग प्रमुखांच्या स्तरावर घ्यावा व वर्षाच्या शेवटच्या महिन्यात प्रमाणाबाहेर खर्च (Rush of Expenditure) होणार नाही याची दक्षता घ्यावी व तशा सूचना नियंत्रक अधिकाऱ्यांना द्याव्यात. याबाबत आर्थिक अनियमितता झाल्यास त्यास प्रशासकीय विभाग जबाबदार राहिल. तसेच, डिसेंबर, २०२५ अखेर ज्या विभागांचे खर्चाचे प्रमाण ५० % पेक्षा कमी असेल अशा विभागांच्या तरतूदी सुधारित अंदाज तयार करताना प्रमाणशीर पध्दतीने कमी केल्या जातील व याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागांची राहील.**

२०. उपरोक्त अटी व शर्ती बरोबरच विभागांना सूचना देण्यात येते की, खर्च करताना राज्य शासनाची कार्य नियमावली, वित्तीय नियमावली, अर्थसंकल्पीय नियम पुस्तिकेतील तरतूदी व सर्व अटी/ शर्तींचे पालन करणे ही जबाबदारी विभागांची राहील.

२१. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२५०४०७१४३५०३६८०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIVEK RAMBHAJI DAHIPHALE

Digitally signed by VIVEK RAMBHAJI DAHIPHALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT,
2.5.4.20=56142975484e58364afe88f5f0e3138e3ce0d4e4058e42f003dfd69500064afb, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=3981A50612646983D580DEA2DA5FB52A33D8E6E3C4F34CD80F08C598711CEB65, cn=VIVEK RAMBHAJI DAHIPHALE
Date: 2025.04.07 14:36:26 +05'30'

**(वि.रं.दहिफळे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा. उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मुंबई.
५) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई -३२.
६) सर्व मा. मंत्री आणि मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मुंबई.
७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,मंत्रालय, मुंबई-३२
८) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९) सचिव, महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद विधानमंडळ सचिवालय, मुंबई-३२.

१०) सर्व सह सचिव / उप सचिव (अर्थसंकल्प शाखा), सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
११) सह सचिव / उप सचिव (नोंदणी शाखा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२) विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली ११०००१.
१३) प्रधान महालेखापाल - १/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
१४) प्रधान महालेखापाल - १/२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
१५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई-३२.
१६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई-३२.
१७) निवासी लेखा अधिकारी, मुंबई-३२.
१८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१९) सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी,वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२०) निवड नस्ती, अर्थ-३, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

## महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०२५

## परिपत्रक क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र. ४४ /अर्थ-३, दि.०७ एप्रिल, २०२५ सोबतचे "परिशिष्ट".

| अ.क्र. | खर्चाचे स्वरुप | |
|---|---|---|
| १ | अर्थसंकल्पात समाविष्ट असलेला नवीन अनिवार्य व कार्यक्रम खर्च | अनिवार्य खर्चाबाबत - वित्त विभाग व कार्यक्रम खर्चाबाबत यथास्थिती नियोजन विभाग/ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / आदिवासी विकास विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे आवश्यक राहील. |
| २ | अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या जुन्या कार्यक्रमावरील खर्च | कार्यक्रम खर्चाच्या स्वरुपात अथवा व्याप्तीमध्ये बदल होत असल्यास यथास्थिती नियोजन विभाग / सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / आदिवासी विकास विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे आवश्यक राहील. |
| ३ | अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या चालू व जुन्या अनिवार्य बाबींबरील खर्च | अनिवार्य खर्चाच्या स्वरुपात अथवा व्याप्तीमध्ये बदल होत असल्यास वित्त विभागाची सहमती घेणे आवश्यक राहील. |
| ४ | अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गतचा खर्च | केंद्र पुरस्कृत योजनांबाबत केंद्र शासनाने वितरीत केलेला निधी राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा झाल्याची खात्री करण्याबाबत वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१०१८/प्र.क्र.४६/ अर्थोपाय, दिनांक ५ डिसेंबर, २०२३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. यासाठी नस्ती वित्त विभागास सहमतीसाठी वेगळ्याने संदर्भीत करण्याची आवश्यकता नाही.<br>**केंद्र पुरस्कृत योजनांसाठी केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा निधी एकूण अर्थसंकल्पीय तरतूदीच्या १०० टक्केच्या मर्यादेत बीम्स प्रणालीवर वितरीत करण्यात येत आहे. मागील वर्षामधील केंद्र शासनाचा निधी चालू वर्षी खर्च करावयाचा असल्यास त्यास आवश्यकतेप्रमाणे यथास्थिती नियोजन विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व आदिवासी विकास विभाग तसेच वित्त विभागाची सहमती घेणे अनिवार्य राहिल. केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत ज्या विभागाचे SNA खाते सुरु आहे त्या विभागाने सदर निधी विहीत मुदतीत SNA खात्यात वर्ग करण्याबाबत विभागाने दक्षता घ्यावी.** |
| ५ | अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या बाह्य सहाय्यित कार्यक्रमांचा खर्च | नियोजन व वित्त विभागाची सहमती घेणे आवश्यक राहील. |
| ६ | शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार राबविण्यात येणारे विशेष स्वरुपाचे कार्यक्रम (उदा. कर्जमाफी योजना, नुकसान भरपाईसाठी अर्थसहाय्य) | वित्त विभाग यथास्थिती नियोजन विभाग / सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / आदिवासी विकास विभागाची सहमती घेणे आवश्यक राहील. |
| ७ | तेराव्या / चौदाव्या तसेच मागील केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केलेल्या सर्व तरतूदी | वित्त विभागाची सहमती घेणे आवश्यक राहील. |
| ८ | ४५) व्याज प्रदाने.<br>५६) कर्जाची परतफेड. | राष्ट्रीय सहकार विकास निगम कडून प्राप्त झालेल्या कर्जावरील व्याज व परतफेडीची रक्कम प्रत्यक्षात झालेल्या वसूलीच्या मर्यादेतच वितरीत |

<table>
<tr><td></td><td></td><td>केली जाईल. त्याबाबत वित्त विभागाची संमती घेणे आवश्यक राहील.</td></tr>
<tr><td rowspan="7">९</td><td>अनिवार्य व कार्यक्रम खर्चाच्या तरतुदीपैकी खालील तपशीलवार शिर्षाचा खर्च.</td><td rowspan="7">तपासणी सूची :-<br>१) योजनेस प्रशासकीय मान्यता.<br>२) निधी वितरण शासन निर्णयातील अटी व शर्तीची पुर्तता झाल्यानंतरच होणार आहे.<br>३) यापूर्वी वितरीत केलेल्या ७५% निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र.<br>४) यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षक / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत.<br>५) निधी लाभार्थ्याच्या थेट खात्यात जमा होणार आहे.<br>६) वस्तु खरेदी करण्यापूर्वी खरेदी केलेल्या अशा वस्तुंची नोंद Dead Stock रजिस्टर मध्ये घेण्यात आली असून त्याचा योग्य वापर झाला असून त्या पडून नाहीत, याचे प्रमाणपत्र.<br>७) यामधून खरेदी होणार असल्यास प्रत्यक्ष वस्तु प्राप्त झाल्यानंतरच संबंधितांना देयक अदा केले जाणार आहे.<br>८) आवश्यक त्या ठिकाणी नियोजन विभाग / सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / आदिवासी विकास विभाग यांची निधी वितरणास सहमती आहे.<br>९) प्रस्तुत योजनेत कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.<br>१०) निधी स्वीय प्रपंजी लेखा अथवा बँक खात्यात जमा न करता खर्च केला जाणार आहे.<br>वरील अटींची तसेच सदर शासन परिपत्रकातील परिच्छेद ५ ते १९ मधील अटींची पुर्तता होत असल्यास प्रशासकीय विभागाने त्यांच्या स्तरावर निधी वितरीत करावा व निधी वितरीत करणाऱ्या आदेशामध्ये वरील प्रत्येक अटीची पुर्तता झाली आहे, असे प्रमाणपत्र देऊन आदेश निर्गमित करावेत, अन्यथा प्रस्ताव आवश्यक त्या ठिकाणी नियोजन विभाग / सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / आदिवासी विकास विभाग व वित्त विभागाला सहमतीसाठी सादर करावेत.</td></tr>
<tr><td>३१) सहायक अनुदाने (वेतनेतर)</td></tr>
<tr><td>३२) अंशदाने</td></tr>
<tr><td>३३) अर्थसहाय्य</td></tr>
<tr><td>३५) भांडवली खर्चासाठी सहाय्यक अनुदाने</td></tr>
<tr><td>५४) गुंतवणूका</td></tr>
<tr><td>५५) कर्जे व अग्रिम (७६१० शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे हा भाग वगळून)</td></tr>
</table>

VIVEK RAMBHAJI DAHIPHALE

Digitally signed by VIVEK RAMBHAJI DAHIPHALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT,
2.5.4.20=56142975484e58364afe88f5f0e3138e3ce0d4e4058e42f003dfd69500064afb, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=3981A50612646983D580DEA2DA5FB52A33D8E6E3C4F34CD80F08C598711CEB65, cn=VIVEK RAMBHAJI DAHIPHALE
Date: 2025.04.07 14:36:53 +05'30'

**(वि.रं.दहिफळे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**